सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.blogspot.com

वर्ष २४ वे ● अंक २८९ ● शनिवार दि. १५ ऑगस्ट २०२६ ● नांदेड ● पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी/२६२/२०२६-२०२८ ● पाने ४ ● मुल्य १ रु.


भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा..!

– संपादक



# स्वातंत्र्याचा अर्थ आणि लोकशाहीचे भान

**१५ ऑगस्ट हा प्रत्येक भारतीयाच्या मनात अभिमान आणि कृतज्ञता जागवणारा दिवस. शेकडो वर्षांच्या परकीय सत्तेच्या जोखडातून भारताला मुक्त करण्यासाठी असंख्य स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या आयुष्याचे बलिदान दिले. कुणी तुरुंगवास भोगला, कुणी लाठ्या-काठ्या खाल्लूया, कुणी घरदार सोडले, तर कुणी देशाच्या स्वातंत्र्यासाठी हसत हसत फासाचा दोर स्वीकारला. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, सरदार वल्लभभाई पटेल, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यवीरांच्या त्यागामुळे १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. त्यामुळे स्वातंत्र्य दिन हा केवळ ध्वजारोहण, राष्ट्रगीत आणि शुभेच्छांचा दिवस न राहता आपल्या स्वातंत्र्याच्या अर्थाचे आणि देशाच्या वर्तमानाचे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला; मात्र स्वातंत्र्य टिकविणे आणि त्याचा योग्य उपयोग करणे ही त्याहून मोठी जबाबदारी आहे. आज आपण राजकीयदृष्ट्या स्वतंत्र आहोत. आपल्या देशाचे शासन आपण निवडतो, आपले प्रतिनिधी आपण मतदानातून निवडतो आणि आपल्या संविधानाने प्रत्येक नागरिकाला मूलभूत अधिकार दिले आहेत. मात्र स्वातंत्र्याचा खरा अर्थ केवळ सत्ता आपल्या हातात आली एवढाच नाही. देशातील प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगता आले पाहिजे, त्याला शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि न्यायाची समान संधी मिळाली पाहिजे. समाजातील शेवटच्या घटकाच्या जीवनात सकारात्मक बदल घडला तरच स्वातंत्र्याचा खरा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला असे म्हणता येईल. आज देश प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, संरक्षण, डिजिटल व्यवहार, पायाभूत सुविधा अशा अनेक क्षेत्रांत भारताने उल्लेखनीय प्रगती केली आहे. जगाच्या पटलावर भारताचे महत्त्व वाढत आहे. देशातील तरुणाई नवनवीन क्षेत्रांत आपली क्षमता सिद्ध करीत आहे. ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. परंतु या प्रगतीबरोबरच देशासमोरील आव्हानांकडे डोळेझाक करून चालणार नाही. महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या, कामगारांचे प्रश्न, वाढती आर्थिक विषमता, शिक्षणातील असमानता, आरोग्य व्यवस्थेतील त्रुटी आणि भ्रष्टाचार यांसारख्या प्रश्नांवर अजूनही प्रभावीपणे मात करावी लागणार आहे. देशाची अर्थव्यवस्था मोठी होत असताना सामान्य माणसाच्या हातात पैसा, रोजगार आणि सुरक्षित भविष्य आले पाहिजे. शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला असेल, युवक रोजगारासाठी भटकत असेल किंवा गरीब कुटुंबाला मूलभूत सुविधा मिळत नसतील तर केवळ आर्थिक विकासाचे आकडे समाधान देऊ शकत नाहीत. विकासाचा केंद्रबिंदू सामान्य नागरिक असला पाहिजे. भारताची खरी ओळख त्याच्या लोकशाही व्यवस्थेत आणि संविधानिक मूल्यांमध्ये आहे. विविध भाषा, धर्म, जाती, संस्कृती आणि परंपरा असतानाही भारत एकसंध राहिला, याचे श्रेय आपल्या संविधानाला जाते. संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिला आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, मतदानाचा अधिकार आणि कायद्यापुढे समानता ही लोकशाहीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे लोकशाहीमध्ये सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही; उलट प्रश्न विचारणारा नागरिक ही लोकशाहीची ताकद आहे.सत्ताधारी पक्ष आणि विरोधक यांच्यात मतभेद असणे स्वाभाविक आहे. मात्र मतभेदांचे रूप वैरात बदलणे देशाच्या लोकशाहीसाठी धोकादायक आहे. संसद आणि विधिमंडळे ही जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची व्यासपीठे आहेत. तेथे गोंधळापेक्षा चर्चा, आरोपांपेक्षा उत्तरदायित्व आणि राजकीय स्वार्थापेक्षा जनहिताला महत्त्व मिळाले पाहिजे. माध्यमांनाही निर्भयपणे प्रश्न विचारण्याचे आणि जनतेसमोर सत्य मांडण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. लोकशाहीतील संस्था मजबूत राहिल्या तरच नागरिकांचे स्वातंत्र्य सुरक्षित राहू शकते. आजच्या डिजिटल युगात स्वातंत्र्याबरोबर जबाबदारीचे भान ठेवणे अधिक आवश्यक झाले आहे. सोशल मीडियामुळे प्रत्येकाच्या हातात आपले मत व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आले आहे. परंतु त्याच माध्यमातून खोटी माहिती, अफवा, द्वेष आणि समाजात तेढ निर्माण करणारा प्रचारही वेगाने पसरतो. त्यामुळे व्यक्ति स्वातंत्र्याचा वापर करताना सामाजिक जबाबदारी विसरता कामा नये. आपले मत वेगळे असू शकते; पण दुसऱ्याच्या मताचा सन्मान करणे हीच लोकशाहीची खरी संस्कृती आहे.स्वातंत्र्याचा अर्थ केवळ परकीय सत्तेपासून मुक्ती एवढाच मर्यादित नाही. गरिबीपासून स्वातंत्र्य, अज्ञानापासून स्वातंत्र्य, बेरोजगारीपासून स्वातंत्र्य, भ्रष्टाचारापासून स्वातंत्र्य, सामाजिक विषमतेपासून स्वातंत्र्य आणि भीतीपासून स्वातंत्र्य मिळविणे हीदेखील राष्ट्रनिर्मितीचीच प्रक्रिया आहे. महिलांना सुरक्षित वातावरण, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, युवकांना रोजगार, कामगारांना न्याय आणि शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळणे हे स्वातंत्र्याच्या व्यापक अर्थाचेच भाग आहेत.देशाचा विकास केवळ सरकारच्या प्रयत्नांनी होऊ शकत नाही. नागरिकांनीही आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, कर भरणे, मतदानाचा अधिकार जबाबदारीने वापरणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, कायद्याचा सन्मान करणे आणि जात-धर्माच्या नावावर समाजात तेढ निर्माण न करणे ही प्रत्येक नागरिकाची कर्तव्ये आहेत. देशभक्ती केवळ घोषणांमध्ये किंवा सोशल मीडियावरील संदेशांमध्ये नसते; ती आपल्या दैनंदिन आचरणातून दिसली पाहिजे. आज तिरंग्याला सलाम करताना आपण केवळ स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाचे स्मरण करू नये, तर त्यांनी ज्या भारताचे स्वप्न पाहिले त्या भारताच्या निर्मितीचा संकल्प केला पाहिजे. स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्याला स्वतंत्र भारत दिला; आता तो अधिक समतावादी, सक्षम, सुशिक्षित, सुरक्षित आणि न्याय्य बनविण्याची जबाबदारी आपल्या पिढीची आहे.स्वातंत्र्याचा खरा उत्सव तेव्हाच साजरा होईल, जेव्हा देशातील प्रत्येक नागरिकाला आपण या राष्ट्राचे समान आणि सन्मानाचे घटक आहोत, अशी जाणीव होईल. तिरंगा आकाशात उंच फडकत राहण्यासाठी देशातील लोकशाही, संविधान आणि सामाजिक एकता तितकीच भक्कम राहिली पाहिजे. म्हणून या स्वातंत्र्य दिनी एकच संकल्प करूया. स्वातंत्र्याची किंमत ओळखू, संविधानाचे रक्षण करू, लोकशाही मजबूत करू आणि सर्वसामान्यांच्या जीवनात खऱ्या स्वातंत्र्याचा प्रकाश पोहोचवू. हेच स्वातंत्र्यवीरांना खरे अभिवादन ठरेल!**

# भारतीय स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्ये



१५ ऑगस्ट हा प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्राभिमान, कृतज्ञता आणि जबाबदारीची भावना जागविणारा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताने ब्रिटिशांच्या दीर्घकालीन वसाहतवादी राजवटीतून स्वातंत्र्य प्राप्त केले आणि एका स्वतंत्र राष्ट्राच्या नव्या पर्वाला प्रारंभ झाला. या दिवसाचे महत्त्व केवळ ध्वजारोहण, राष्ट्रगीत, देशभक्तिपर गीते आणि विविध कार्यक्रमांपुरते मर्यादित नाही. भारतीय स्वातंत्र्याच्या मागे अनेक पिढ्यांचा संघर्ष, असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान आणि कोट्यवधी भारतीयांच्या स्वराज्याच्या आकांक्षेची प्रेरणा आहे. त्यामुळे स्वातंत्र्यदिन हा इतिहासाचे स्मरण करण्याचा दिवस तर आहेच; पण त्याचबरोबर स्वातंत्र्याचा अर्थ समजून घेण्याचा, संविधानिक मूल्यांचे महत्त्व जाणून घेण्याचा आणि स्वतंत्र भारताच्या भविष्यासाठी आपली जबाबदारी निश्चित करण्याचा दिवस आहे. भारताला मिळालेले स्वातंत्र्य सहजासहजी प्राप्त झालेले नव्हते. ब्रिटिश सत्तेच्या काळात भारतीयांना अनेक प्रकारच्या शोषणाला सामोरे जावे लागले. या परिस्थितीत परकीय सत्तेविरुद्ध असंतोष वाढत गेला. स्वराज्य आणि स्वाभिमानाची भावना भारतीय समाजात दृढ होत गेली. १८५७ चा उठाव हा ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या संघर्षातील महत्त्वाचा टप्पा ठरला. पुढील काळात भारतीय राष्ट्रीय चळवळीला संघटित स्वरूप प्राप्त झाले.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतर भारतीयांच्या राजकीय हक्कांसाठी संघर्ष केला. स्वदेशी आणि बहिष्काराच्या चळवळीने भारतीयांमध्ये आत्मनिर्भरतेची भावना निर्माण केली. या काळात सामाजिक सुधारणांच्या चळवळीनेही राष्ट्रनिर्मितीला महत्त्वपूर्ण आधार दिला. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण, स्त्रीमुक्ती आणि सामाजिक समतेसाठी केलेले कार्य भारतीय समाजाच्या परिवर्तनाचा महत्त्वाचा टप्पा ठरले. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्याय आणि शिक्षणासाठी केलेले कार्य तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समानता आणि मानवी प्रतिष्ठेसाठी केलेला संघर्ष यामुळे स्वातंत्र्याची संकल्पना केवळ परकीय सत्तेपासून मुक्तीपुरती राहिली नाही, तर सामाजिक न्यायाशीही जोडली गेली. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढ्याला व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. सत्य, अहिंसा आणि सत्याग्रहाच्या माध्यमातून गांधीजींनी सामान्य नागरिकांना स्वातंत्र्याच्या संघर्षात सहभागी करून घेतले. असहकार आंदोलन, मिठाचा सत्याग्रह आणि भारत छोडो आंदोलन या विविध टप्प्यांतून ब्रिटिश सत्तेला भारतीय जनतेच्या सामूहिक शक्तीची जाणीव झाली. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारकांचे योगदानही अविस्मरणीय आहे. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद आणि असंख्य क्रांतिकारकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून ब्रिटिश सत्तेला आव्हान दिले. महिलांनीही या संघर्षात मोठ्या धैर्याने सहभाग घेतला. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्याची गाथा ही संपूर्ण समाजाच्या सामूहिक संघर्षाची गाथा आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला; परंतु स्वातंत्र्याबरोबर फाळणीची शोकांतिका देशाच्या वाट्याला आली. भारत आणि पाकिस्तान अशी विभागणी झाली आणि मोठ्या प्रमाणावर हिंसाचार व विस्थापन झाले. स्वातंत्र्याचा आनंद आणि फाळणीचे दुःख या दोन्हींच्या छायेत स्वतंत्र भारताचा जन्म झाला. त्यामुळे स्वातंत्र्यदिन हा आनंदाचा दिवस असला तरी तो राष्ट्रीय एकात्मता, बंधुता आणि सामाजिक सलोखा जपण्याची जबाबदारीही आपल्याला स्मरवून देतो.

स्वातंत्र्यानंतर भारतासमोर राष्ट्रनिर्मितीची मोठी आव्हाने होती. गरिबी, अशिक्षितता, बेरोजगारी, आरोग्याच्या समस्या आणि आर्थिक मागासलेपण यांवर मात करणे आवश्यक होते. या परिस्थितीत भारताने लोकशाहीचा मार्ग स्वीकारला. जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागू झाले आणि भारत प्रजासत्ताक बनला. संविधान हे स्वतंत्र भारताच्या राष्ट्रजीवनाचे मूलभूत अधिष्ठान ठरले. संविधानाच्या उद्देशिकेत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. ही मूल्ये केवळ संविधानातील शब्द नाहीत; ती भारतीय लोकशाहीच्या यशाची मूलभूत तत्त्वे आहेत. न्याय हे संविधानिक मूल्य भारतीय राष्ट्रनिर्मितीचे महत्त्वाचे ध्येय आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाशिवाय स्वातंत्र्याला पूर्ण अर्थ प्राप्त होत नाही. समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांना समान संधी उपलब्ध करून देणे, भेदभाव दूर करणे आणि प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याची संधी देणे ही न्यायाची खरी कसोटी आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने कायदे आणि धोरणांच्या माध्यमातून सामाजिक न्यायाच्या दिशेने अनेक पावले उचलली आहेत. मात्र सामाजिक विषमता पूर्णपणे नाहीशी करण्यासाठी संविधानिक मूल्यांचे आचरण समाजाच्या प्रत्येक स्तरावर होणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य हे भारतीय संविधानाचे आणखी एक महत्त्वाचे मूल्य आहे. विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि उपासना यांचे स्वातंत्र्य नागरिकांना देण्यात आले आहे. परंतु स्वातंत्र्याचा अर्थ मनमानी नव्हे. आपल्या स्वातंत्र्याचा वापर करताना इतरांच्या अधिकारांचा आणि प्रतिष्ठेचा आदर करणे आवश्यक आहे. आजच्या सामाजिक माध्यमांच्या युगात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न अधिक महत्त्वाचा झाला आहे. खोटी माहिती, अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि समाजात तेढ निर्माण करणारा मजकूर यामुळे लोकशाही आणि सामाजिक सलोख्याला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे स्वातंत्र्यासोबत विवेक आणि जबाबदारी आवश्यक आहे. समता हे संविधानिक मूल्य भारतीय समाजासाठी विशेष महत्त्वाचे आहे. जात, धर्म, लिंग किंवा इतर कोणत्याही आधारावर भेदभाव होऊ नये, ही संविधानाची स्पष्ट भूमिका आहे. भारतीय समाजाच्या इतिहासात जातीय विषमता आणि सामाजिक भेदभावाची मोठी परंपरा राहिली आहे. त्यामुळे संविधानाने कायदेशीर समानतेबरोबर सामाजिक न्यायालाही महत्त्व दिले. आज कायद्याच्या दृष्टीने समानता प्रस्थापित झाली असली तरी सामाजिक व्यवहारात समानता पूर्णपणे रुजविण्याचे काम अद्याप बाकी आहे. स्त्री-पुरुष समानता, जातीय भेदभावाचा अंत आणि वंचित घटकांना समान संधी यांसाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. बंधुता हे भारतीय संविधानातील अत्यंत सुंदर आणि आवश्यक मूल्य आहे. भारताची विविधता ही त्याची मोठी ताकद आहे. अनेक भाषा, धर्म, जाती, पंथ आणि संस्कृती असूनही भारतीय समाज एका राष्ट्रीय भावनेने जोडलेला आहे. ही एकता टिकविण्यासाठी परस्पर आदर, सहिष्णुता आणि मानवी प्रतिष्ठेची जाणीव आवश्यक आहे. मतभेद असणे हे लोकशाहीचे लक्षण आहे; मात्र मतभेदांचे रूपांतर वैरात होऊ नये. दुसऱ्याच्या मताचा आदर करणे, विविधतेचा स्वीकार करणे आणि सामाजिक सलोखा जपणे ही बंधुतेची खरी भावना आहे. भारतीय लोकशाहीचे यश हे संविधानिक मूल्यांच्या प्रत्यक्ष आचरणावर अवलंबून आहे. लोकशाही म्हणजे केवळ निवडणूक आणि मतदान नव्हे. नागरिकांचा सहभाग, प्रश्न विचारण्याचा अधिकार, सत्तेवर नियंत्रण, कायद्याचे राज्य आणि विरोधी मतांचा आदर हे लोकशाहीचे महत्त्वाचे घटक आहेत. मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा आधार असला तरी सुजाणपणे मतदान करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. जात, धर्म, पैसा किंवा क्षणिक भावनांपेक्षा सार्वजनिक हिताचा विचार करून मतदान करणारा नागरिक लोकशाही अधिक मजबूत करतो.

संविधानाने नागरिकांना मूलभूत अधिकार दिले असले तरी मूलभूत कर्तव्यांचीही जाणीव करून दिली आहे. संविधानाचा आदर करणे, राष्ट्रीय एकता आणि अखंडता जपणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे आणि उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करणे ही नागरिकांची कर्तव्ये आहेत. आज स्वातंत्र्यदिन साजरा करताना अधिकारांसोबत कर्तव्यांचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. अधिकारांचा आग्रह धरणाऱ्या नागरिकांनी आपल्या कर्तव्यांपासून दूर राहणे ही लोकशाहीसाठी योग्य बाब नाही. शिक्षण हे संविधानिक मूल्ये रुजविण्याचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्या अधिकारांची जाणीव होते, विवेक विकसित होतो आणि सामाजिक प्रश्नांकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्याची क्षमता प्राप्त होते. शाळा आणि महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी तयार न करता संविधान, लोकशाही, समानता, बंधुता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचे संस्कार दिले पाहिजेत. प्रश्न विचारणारा, विचार करणारा, विविध मतांचा आदर करणारा आणि सामाजिक जबाबदारी स्वीकारणारा विद्यार्थी हा भविष्यातील सक्षम नागरिक ठरतो. आजच्या भारतात युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. स्वातंत्र्यलढ्यातील युवकांनी देशासाठी बलिदान दिले. आजच्या युवकांनी ज्ञान, कौशल्य, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योजकता आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून देशाच्या विकासात योगदान द्यावे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि नवउद्योजकता यांसारख्या क्षेत्रांत युवकांसमोर मोठ्या संधी आहेत. मात्र तंत्रज्ञानासोबत विवेक, नैतिकता आणि सामाजिक संवेदनशीलता असणेही आवश्यक आहे. राष्ट्राचे भविष्य केवळ तंत्रज्ञानाच्या प्रगतीत नसून सक्षम आणि जबाबदार नागरिक घडविण्यात आहे. महिलांचे सक्षमीकरण हे संविधानिक समतेचे महत्त्वाचे प्रतीक आहे. महिलांनी शिक्षण, विज्ञान, प्रशासन, उद्योग, क्रीडा, संरक्षण आणि राजकारण या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तरीही महिलांवरील हिंसा, भेदभाव, असमान संधी आणि आर्थिक परावलंबित्व यांसारखे प्रश्न पूर्णपणे संपलेले नाहीत. स्त्रीला समान प्रतिष्ठा, समान संधी आणि सुरक्षित वातावरण मिळणे ही आधुनिक भारताची गरज आहे. घरापासून कार्यक्षेत्रापर्यंत समानतेची संस्कृती रुजविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

ग्रामीण भारत आणि शेतकरी हे देशाच्या विकासाचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. शेती, ग्रामीण रोजगार, जलसंधारण आणि स्थानिक अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणाशिवाय भारताचा सर्वांगीण विकास शक्य नाही. हवामान बदल, पाण्याची कमतरता, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारातील अनिश्चितता यांसारखी आव्हाने शेतकऱ्यांसमोर आहेत. ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि तंत्रज्ञानाच्या समान संधी निर्माण करणे हे सामाजिक न्यायाचेच एक रूप आहे. विकासाची फळे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली तरच स्वातंत्र्याचा अर्थ अधिक व्यापक होईल. पर्यावरणसंवर्धन हे आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचे नागरिक कर्तव्य आहे. पाणी, हवा, जंगल आणि जैवविविधता यांचे संरक्षण केवळ वर्तमानासाठी नव्हे तर भावी पिढ्यांसाठी आवश्यक आहे. पाण्याची बचत, वृक्षसंवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि सार्वजनिक परिसराची स्वच्छता यासाठी प्रत्येक नागरिकाने योगदान दिले पाहिजे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन साधणे ही आजच्या राष्ट्रनिर्मितीची गरज आहे. निसर्गाचा ऱ्हास करून साधलेला विकास दीर्घकाळ टिकणारा ठरू शकत नाही. आज भारत विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, माहिती तंत्रज्ञान, औषधनिर्मिती आणि डिजिटल क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करीत आहे. या प्रगतीचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानामुळे सुविधा वाढत असल्या तरी डिजिटल दरीही लक्षात घेतली पाहिजे. ग्रामीण आणि वंचित समाजघटकांना डिजिटल साधनांची उपलब्धता, माहिती आणि कौशल्ये मिळाली तर तंत्रज्ञान सामाजिक सक्षमीकरणाचे प्रभावी साधन बनू शकते. देशभक्तीचा अर्थही आज नव्याने समजून घेण्याची गरज आहे. देशभक्ती म्हणजे केवळ राष्ट्रीय सणांच्या दिवशी तिरंग्याला सलाम करणे किंवा घोषवाक्ये देणे नव्हे. आपल्या कामात प्रामाणिक राहणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, पर्यावरण जपणे, गरजू व्यक्तीला मदत करणे आणि सामाजिक भेदभावाला विरोध करणे हीदेखील देशभक्तीचीच रूपे आहेत. सीमांचे रक्षण करणारा सैनिक जसा राष्ट्रसेवा करतो, त्याचप्रमाणे प्रामाणिकपणे काम करणारा शिक्षक, शेतकरी, वैज्ञानिक, डॉक्टर, कामगार आणि प्रत्येक जबाबदार नागरिक राष्ट्रनिर्मितीत योगदान देत असतो. भारतीय स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्ये यांचा संबंध अतूट आहे. स्वातंत्र्यलढ्याने भारताला परकीय सत्तेपासून मुक्त केले, तर संविधानाने त्या स्वातंत्र्याला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची दिशा दिली. स्वातंत्र्याने आपल्याला स्वतःचे शासन करण्याचा अधिकार दिला; संविधानाने त्या शासनाची लोकशाही चौकट निश्चित केली. स्वातंत्र्याने राष्ट्रीय अस्मिता निर्माण केली; संविधानाने प्रत्येक नागरिकाच्या प्रतिष्ठेला समान स्थान दिले. म्हणूनच स्वातंत्र्यदिनाचा खरा उत्सव हा संविधानिक मूल्यांचा सन्मान आणि त्यांच्या आचरणातूनच पूर्ण होतो.

आज भारत स्वातंत्र्याच्या ऐंशीव्या वर्षात प्रवेश करीत असताना मागील प्रवासाचा अभिमान बाळगतानाच पुढील वाटचालीचे आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. देशाने विज्ञान, तंत्रज्ञान, शेती, उद्योग, शिक्षण आणि लोकशाहीच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. परंतु सामाजिक विषमता, बेरोजगारी, गरिबी, पर्यावरणीय संकट, शिक्षण आणि आरोग्यातील असमानता यांसारखी आव्हाने अद्याप आहेत. त्यामुळे आर्थिक प्रगतीसोबत सामाजिक न्याय, तंत्रज्ञानासोबत मानवी संवेदना आणि अधिकारांसोबत कर्तव्य यांचा समतोल साधणे आवश्यक आहे. या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपण ज्ञात-अज्ञात सर्व स्वातंत्र्यसैनिकांना विनम्र अभिवादन करूया. त्यांच्या त्यागाचे स्मरण करून संविधानिक मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याचा संकल्प करूया. न्यायासाठी उभे राहूया, स्वातंत्र्याचा जबाबदारीने वापर करूया, समानतेचा स्वीकार करूया आणि बंधुतेची भावना वाढवूया. जात, धर्म, भाषा, लिंग किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारावर भेदभाव न करता प्रत्येक व्यक्तीला सन्मान देऊया. लोकशाहीतील मतभेदांचा आदर करूया आणि संवादाची संस्कृती मजबूत करूया. स्वातंत्र्य ही आपल्या पूर्वजांनी दिलेली अमूल्य देणगी आहे; परंतु ती पुढील पिढ्यांसाठी अधिक समृद्ध करून ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. स्वातंत्र्यवीरांनी परकीय सत्तेच्या बेड्या तोडल्या; आज आपल्याला अज्ञान, विषमता, सामाजिक द्वेष, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांसारख्या नव्या आव्हानांवर मात करायची आहे. ही लढाई शस्त्रांची नसून ज्ञानाची, विवेकाची, प्रामाणिकपणाची आणि सामाजिक बांधिलकीची आहे. तिरंगा जेव्हा आकाशात डौलाने फडकतो, तेव्हा त्याच्याकडे पाहताना आपल्या मनात केवळ राष्ट्राभिमान नव्हे, तर राष्ट्रीय कर्तव्याची जाणीवही निर्माण झाली पाहिजे. त्या तिरंग्यात स्वातंत्र्यवीरांचा त्याग, संविधाननिर्मात्यांची दूरदृष्टी आणि कोट्यवधी भारतीयांच्या भविष्याची स्वप्ने सामावलेली आहेत. त्या स्वप्नांना साकार करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडणे आवश्यक आहे. म्हणूनच या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपण असा भारत घडविण्याचा संकल्प करूया, जिथे प्रत्येक मुलाला शिक्षणाची संधी मिळेल, प्रत्येक युवकाला सन्मानजनक रोजगाराची संधी मिळेल, प्रत्येक महिलेला समानता आणि सुरक्षितता मिळेल, प्रत्येक शेतकऱ्याला सन्मानाने जगता येईल, प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला समान संधी मिळेल आणि कोणत्याही व्यक्तीला जात, धर्म, भाषा किंवा आर्थिक परिस्थितीमुळे अन्याय सहन करावा लागणार नाही. असा भारत निर्माण करणे हीच संविधानिक मूल्यांची खरी अंमलबजावणी ठरेल. भारतीय स्वातंत्र्य ही केवळ भूतकाळातील ऐतिहासिक घटना नाही; ती वर्तमानातील जबाबदारी आणि भविष्याची आशा आहे. संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून भारतीय लोकशाहीचे नैतिक अधिष्ठान आहे. स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्यांचा संगमच भारताच्या राष्ट्रजीवनाला अर्थ देतो. म्हणून स्वातंत्र्यदिन साजरा करताना संविधानाचा सन्मान, लोकशाहीवरील विश्वास, सामाजिक समतेची बांधिलकी आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना आपल्या मनात दृढ करूया.

स्वातंत्र्य मिळविणे हा आपल्या पूर्वजांचा महान पराक्रम होता; परंतु त्या स्वातंत्र्याला न्याय, समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेने समृद्ध करणे ही आपल्या पिढीची ऐतिहासिक जबाबदारी आहे. आपल्या प्रत्येक जबाबदार कृतीतून संविधानिक मूल्यांना बळ मिळाले, तर स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाला खरी आदरांजली मिळेल. तिरंगा सदैव उंच फडकत राहो, भारतीय लोकशाही अधिक बळकट होत राहो, संविधानिक मूल्यांचा प्रकाश समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचो आणि भारत अधिक समतामूलक, न्याय्य, सक्षम व मानवी राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहो, हीच स्वातंत्र्यदिनाच्या पवित्र प्रसंगी मनःपूर्वक शुभेच्छा.

डॉ.राजेंद्र बगाटे

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# मराठवाडा दुष्काळमुक्त करुन दाखवू; मुख्यमंत्री फडणवीसांची जाहीर ग्वाही

जालना : मराठवाड्याने पिढ्यान्‌पिढ्या दुष्काळाचा सामना केला आहे. मात्र, आता मराठवाड्याला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्याचा निर्धार राज्य सरकारने केला असून, यासाठी पश्चिम वाहिनी नद्यांचे ८० टीएमसी पाणी मराठवाड्यात आणि गोदावरी खोऱ्यात आणण्यासह कोल्हापूर, सांगलीच्या पुराचे पाणी उजनी धरणात वळविण्याची योजना राबविण्यात येत आहे. या माध्यमातून पुढील पिढीला दुष्काळ पाहू देणार नाही, अशी जाहीर ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जालन्यात दिली.

भाजपच्या जिल्हा कार्यालयाच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन आणि शेतकरी भव्य मेळाव्याचे आयोजन जालन्यात करण्यात आले होते. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना फडणवीस यांनी मराठवाड्याच्या पाणीप्रश्नावर सरकारच्या नियोजनाची माहिती दिली. मराठवाड्याला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्यासाठी सरकार काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. फडणवीस म्हणाले, मराठवाड्याला नेहमीसाठी दुष्काळमुक्त करण्याचे काम आपण करत आहोत. एकीकडे कोल्हापूर आणि सांगलीच्या पुराचे पाणी उजनी धरणात आणण्यात येणार आहे. तर दुसरीकडे पश्चिम वाहिनी नद्यांचे ८० टीएमसी पाणी कोकणातून थेट मराठवाड्यात आणि गोदावरीच्या खोऱ्यात



आणले जाणार आहे. या पिढीने दुष्काळ पाहिला आहे; मात्र पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू देणार नाही. दुष्काळमुक्त मराठवाडा करून दाखवू, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

भाजपच्या नवीन जिल्हा कार्यालयाच्या भूमिपूजनाबाबत बोलताना फडणवीस यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठी कार्यालय म्हणजे हक्काचे घर असल्याचे सांगितले. भाजप आज देशातील सर्वांत मोठा पक्ष असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश वेगाने विकसित होत आहे. गेल्या काही वर्षांत २५ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्याचे काम झाले असून, देशात परिवर्तनाची प्रक्रिया वेगाने सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, जालन्याच्या औद्योगिक आणि कृषी क्षेत्राबरोबरच रेशीम उद्योगाच्या वाढत्या संधींकडेही फडणवीस यांनी लक्ष वेधले. पूर्वी जालन्याची ओळख स्टील आणि सीडमुळे होती. आता त्यात सिल्कची भर पडली असून, जालना तीन एसमुळे ओळखला जाईल, असे त्यांनी सांगितले. भारत पूर्वी रेशीम निर्यात करणारा देश होता; मात्र सध्या रेशीम आयात करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे भविष्यात रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी अधिक काम करण्याची गरज आहे. पैठण, येवला आणि जालना या भागांत महिलांना घरोघरी हातमाग उपलब्ध करून देऊन रोजगाराच्या संधी निर्माण करता येतील का, यावरही विचार करण्याची गरज असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. मराठवाड्याच्या दुष्काळाचा कायमस्वरूपी प्रश्न सोडविण्यासाठी मोठ्या जलप्रकल्पांचे नियोजन आणि उपलब्ध पाण्याचे योग्य व्यवस्थापन करण्यावर सरकारचा भर असल्याचे मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यातून स्पष्ट झाले.

# काँग्रेसचे अध्यक्ष खा.खरगे यांच्या सभास्थळाच्या शुद्धीकरणाविरोधात नांदेडात काँग्रेसचे तीव्र आंदोलन




नांदेड/प्रतिनिधी-काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. मल्लिकार्जुन खरगे यांनी उत्तराखंड येथे एका सभेत मार्गदर्शन केल्यानंतर काही हिंदुत्ववादी संघटनांनी त्या सभास्थळाचे गंगाजलाने शुद्धीकरण केल्याच्या निषेधार्थ नांदेडात काँग्रेस पक्षाच्या वतीने शुक्रवारी तीव्र आंदोलन करण्यात आले. या प्रकारामुळे देशभरातून निषेध व्यक्त होत असताना, आज आयटीआय चौकातील महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोर काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आंदोलन करून संताप व्यक्त केला.

या आंदोलनात खा. रवींद्र चव्हाण, माजी आमदार हणमंत पाटील बेटमोगरेकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, ॲड. सुरेंद्र घोडजकर, अब्दुल गफार, आनंद कल्याणकर, सुरेश हटकर यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. काँग्रेसचे अध्यक्ष खा.मल्लिकार्जुन खरगे यांच्या उत्तराखंडमधील सभेनंतर सभास्थळाचे गंगाजलाने शुद्धीकरण करण्याच्या प्रकाराचा काँग्रेस कार्यकर्त्यांनी निषेध केला. सामाजिक समता, बंधुता आणि लोकशाही मूल्यांचा अवमान करणाऱ्या अशा कृतींविरोधात काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली असून, संबंधित प्रकाराचा निषेध करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोर झालेल्या या आंदोलनातून काँग्रेसने सामाजिक सलोखा आणि समानतेचा संदेश देत अशा प्रकारांना विरोध दर्शविला. आंदोलनामुळे आयटीआय चौक परिसरात काही काळ राजकीय वातावरण तापले होते.

# मराठी न येणाऱ्या रिक्षा-टॅक्सी चालकांवर १८ ऑगस्टपासून कारवाई

मुंबई/प्रतिनिधी-रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान असणे बंधनकारक करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी आता कठोरपणे केली जाणार आहे. मराठी शिकण्यासाठी देण्यात आलेली १५ ऑगस्टची मुदत संपल्यानंतर १८ ऑगस्टपासून मराठी न येणाऱ्या चालकांवर कारवाई सुरू होणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. यापुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

परिवहन विभागाने रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान असावे, अशी भूमिका यापूर्वीच घेतली होती. १ मे २०२६ पासून या निर्णयाच्या अंमलबजावणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली. मात्र, अनेक अमराठी भाषिक चालकांनी मराठी शिकण्यासाठी अधिक वेळ देण्याची मागणी केल्यानंतर सरकारने त्यांना १५ ऑगस्टपर्यंत १०५ दिवसांची मुदत दिली. या कालावधीत चालकांसाठी मराठी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. परिवहन विभागाच्या माहितीनुसार, एक लाखाहून अधिक अमराठी भाषिक रिक्षा-टॅक्सी चालकांनी मराठी प्रशिक्षणासाठी नोंदणी केली आहे. प्रशिक्षणासाठी ११,१०० हून अधिक खासगी शिक्षकांची मदत घेण्यात आली असून, या मोहिमेवर शासनाचा एक कोटी रुपयांहून अधिक खर्च झाला आहे. दरम्यान, १५ ऑगस्ट रोजी या प्रशिक्षण मोहिमेची सांगता होणार असून, त्यानंतर १८ ऑगस्टपासून नियमांची कठोर अंमलबजावणी केली जाणार आहे. चालकांनी यापुढे मुदतवाढीची मागणी करू नये, असे स्पष्ट करत सरनाईक म्हणाले की, १५ ऑगस्ट ही अंतिम मुदत आहे. १७ ऑगस्टला मोहिमेचा समारोप होईल आणि १८ ऑगस्टपासून कारवाईला सुरुवात होईल.नव्या नियमांनुसार, मराठीचे व्यवहारिक ज्ञान नसलेल्या चालकाला प्रथम एक महिन्याची मुदत दिली जाईल. या कालावधीतही मराठी शिकली नाही तर परवाना तीन महिन्यांसाठी निलंबित केला जाईल. त्यानंतर आरटीओ अधिकाऱ्यांकडून संबंधित चालकाची परीक्षा घेऊन मराठीत संवाद साधला जाईल.

# गट-ब व इतर पदाचे परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत गट-ब व इतर पदाचे परीक्षा रविवार १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ ते १० या कालावधीत जिल्ह्यातील आयऑन डिजिटल झोन आयडीझेड विष्णुपूरी एसएसएस. इंदिरा इंन्स्टीटूट ऑफ टेक्नॉलॉजी विष्णुपूरी गेट नं. १८ २२ नांदेड परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे.

या केंद्रापासून ५०० मिटरच्या परिसरात रविवार १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७ ते रात्री १२ वाजेपर्यंतच्या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यक्तीरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी याबाबतचा आदेश १२ ऑगस्ट २०२६ रोजी निर्गमीत केला आहे. या परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी याव्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप आदी तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या ५०० मिटर पर्यंत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास, परीक्षा केंद्रात नेण्यास त्याचप्रमाणे दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील ५०० मीटर पर्यंतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एस.टी.डी., आय.एस.डी., भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास याद्वारे प्रतिबंध करण्यात आले आहे.

# डॉ.विश्वाधार देशमुख यांचे रविवारी व्याख्यान

नांदेड/प्रतिनिधी-नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने कवीवर्य पद्मश्री नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि.१६ ऑगस्ट रोजी सुप्रसिद्ध वक्ते व व्यासंगी अभ्यासक डॉ. विश्वाधार देशमुख यांचे 'नारायण सुर्वे नावाचं विद्यापीठ' या विषयावर व्याख्यान होणार आहे.नारायण सुर्वे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून श्रमिक, कष्टकरी आणि वंचित घटकांच्या जीवनाचे वास्तव प्रभावीपणे मांडले. त्यांच्या कविता आणि साहित्याने मराठी साहित्यविश्वात स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित या व्याख्यानातून सुर्वे यांच्या साहित्यिक कार्याचा, सामाजिक जाणिवांचा आणि विचारविश्वाचा अभ्यासपूर्ण वेध घेतला जाणार आहे. डॉ. विश्वाधार देशमुख हे साहित्य, समाज आणि संस्कृतीविषयक विषयांचे व्यासंगी अभ्यासक व प्रभावी वक्ते म्हणून परिचित आहेत. त्यांच्या व्याख्यानातून नारायण सुर्वे यांच्या साहित्याकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन श्रोत्यांना मिळणार आहे.या व्याख्यानास साहित्यप्रेमी, अभ्यासक, विद्यार्थी, शिक्षक तसेच शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

# सुखबीरसिंघ बादल यांच्यावर हल्ला करणाऱ्या आरोपीस पोलीस कोठडी

नांदेड/प्रतिनिधी-पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री व शिरोमणी अकाली दलाचे प्रमुख सुखबीरसिंघ बादल यांच्यावर मातासाहेब गुरुद्वारा परिसरात हल्ला करणाऱ्या आरोपीस न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

सुखबीरसिंघ बादल हे सहकुटुंब गुरुद्वारा दर्शनासाठी नांदेडला आले होते. मातासाहेब गुरुद्वारा येथे गुरुवारी दुपारी दर्शन करुन बाहेर पडत असतांना



सुखबीरसिंघ बादल यांच्यावर जसपालसिंघ वकील या आरोपीने कृपाणाने हल्ला केला. बादल यांच्या सुरक्षेत तैनात असलेले पोलीस निरिक्षक संतोष केंद्रे यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता बादल यांच्यासमोर झेप घेवून सदरील हल्ला अडविण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये संतोष केंद्रे यांच्या हाताला दुखापत झाली. तसेच या झटापटीत सुखबीरसिंघ बादल यांच्याही हातालाही जखम झाली. काही क्षणातच सुरक्षा कर्मचाऱ्यांनी आरोपी जसपालसिंघ वकील यास ताब्यात घेतले. या घटनेनंतर सुरक्षा यंत्रणेंनी सुखबीरसिंघ बादल व पोलीस निरिक्षक संतोष केंद्रे यांना तातडीने नांदेड येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. याप्रकरणी मुदखेड पोलीस ठाण्यात जसपालसिंघ वकील रा.पुणे याच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस आज (शुक्रवार) पोलीसांनी न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने दि.२४ ऑगस्ट पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# गनपूर येथील जुगार अड्डयावर पोलीसांचा छापा;अठरा जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-गनपूर ता.अर्धापूर शिवारातील शेतातील आखाड्यावर सुरु असलेल्या जुगार अड्डयावर पोलीसांनी शुक्रवारी छापा टाकुन १८ जणांना अटक केली आहे.

गनपूर येथील मारोती खरबे यांच्या शेतातील आखाड्यावर जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती अर्धापूर पोलीसांना मिळाली. पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीसाच्या एका पथकाने शुक्रवारी जुगार अड्डयावर छापा टाकला. तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना माधव विश्वनाथ कदम (वय ४५), गजानन रामराव कदम (वय ५०) रा.कौठा, नवनाथ तुकाराम खुळे (वय ३०), संदीप भगवानराव जगताप (वय ४०) योगेश उत्तमराव खुळे (वय ३२), रावसाहेब उत्तमराव खुळे (वय ४१), दत्ता शामराव मोहिते (वय ४४), संजय बाबुराव जगताप (वय ४३) सर्व रा.गनपूर, गोविंद मधुकर अंधारे रा.दाभड, नारायण बालाजी खुळे (वय ३५), सतीश विठ्ठलराव आढाव (वय २९), कृष्णा राजाराम हेडगे (वय २५), मारोती नानाराव खरबे (वय ३२), भास्कर किशन खरबे (वय ३२), गणेश पांडूरंग पातळे (वय २४), सोपान दिगंबर बंडाळे (वय २९), कृष्णा नारायण खरबे (वय २४) सर्व रा.गनपूर, मारोती भुजंग कल्याणकर रा.कामठा ता.अर्धापूर या अठरा जणांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून रोख रक्कम, ८ दुचाकी वाहने व इतर साहित्य असा ३ लाख ८४ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला.












हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अ‍ॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४